# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जनसंपर्क विभाग

## कोटेशन नोटीस

..........................................................................................................................

नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांची, प्रकल्पांची सोयी-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून ई-न्युज लेटरद्धारे जनमाणसापर्यंत पोहोचविण्यासाठी मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणेकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजे प्राकलन |
|---|---|---|
| १) | इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून महानगरपालिच्या योजनांची, प्रकल्पांची, सोइ-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती जनमाणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी आकर्षक, वस्तूनिष्ठ, प्रतिभाशाली, मराठी ई-न्युज लेटरची दरमहा निर्मिती करणेबाबत. साईज - मॅगझीन साईज, पाने - किमान ४ पाने | र.रु.१.८० लक्ष |

## अटी/शर्ती

१) वरील कामांच्या कोटेशन पत्रक (अटीशर्तीसह) www.nashikcorporation.in या संकेत स्थळावर दिनांक १३ / ०५ /२०१६ ते दिनांक २० / ०५ /२०१६ या कालावधीत उपलब्ध आहे.

२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दिनांक २३ / ०५ /२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेर्पंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही.

३) मराठी ई-न्युज लेटरचा नमूना तयार करुन कोटेशनसोबत जोडणे आवश्यक राहील.

४) मराठी ई-न्युज लेटर दरमहा प्रकाशित करणे आवश्यक राहील. प्रसंगानूसार एखाद्या महिन्यात एका पेक्षा जास्त मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणे गरजेचे वाटल्यास त्यासाठी वेगळा चार्ज दिला जाणार नाही.

५) मराठी ई-न्युज लेटर अथवा तशा स्वरुपाचे काम केलेबाबतचा ७ वर्षाचा अनुभवाचा दाखला/पुरावा कोटेशन सोबत जोडणे आवश्यक राहील.

६) मराठी ई-न्युज लेटरसाठी लागणारी माहिती/फोटोग्राफस् मनपाच्या विविध खात्यांकडून संकलित करणे अथवा इतर ठिकाणाहून संकलित करणेची जबाबदारी कोटेशनधारकाची राहील.

७) मराठी ई-न्युज लेटरचा मसुदा तयार झालेनंतर मा.अति. आयुक्त सो., अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचे मान्यतेनंतरच मराठी ई-न्युज लेटर प्रकाशित करणे आवश्यक आहे. अशी मान्यता घेतलेशिवाय मराठी ई-न्युज लेटर प्रकाशित केल्यास त्याबाबतची जबाबदारी कोटेशनधारकाची राहील.

८) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.

Sd/-

**उपआयुक्त(स्था.सं.क.)**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

<u>नाशिक महानगरपालिका, नाशिक</u>

## <u>जनसंपर्क विभाग : कोटेशन फॉर्म २०१६</u>

**<u>कामाचे नांव</u>** : नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांची, प्रकल्पांची सोयी-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून ई-न्युज लेटरद्धारे जनमाणसापर्यंत पोहोचविण्यासाठी मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणेबाबत.

**<u>कामाची मुदत</u>** : एक वर्ष.

**<u>कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत</u>** : दिनांक २३ / ०५ /२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत.

**<u>कोटेशनधारकाचे नांव व पत्ता</u>** : -------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------

**<u>संपर्क क्रमांक</u>** :

नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांची, प्रकल्पांची सोयी-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून ई-न्युज लेटरद्धारे जनमाणसापर्यंत पोहोचविण्यासाठी मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणेकामी मी/आम्ही खालीलप्रमाणे दर देत आहोत.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति लेटर किंवा दरमहा (सर्व करासह) |
|---|---|---|
| १) | इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून महानगरपालिच्या योजनांची, प्रकल्पांची, सोइ-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती जनमाणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी आकर्षक, वस्तूनिष्ठ, प्रतिभाशाली, मराठी ई-न्युज लेटरची दरमहा निर्मिती करणेबाबत.<br>साईज - मॅगझीन साईज, पाने - किमान ४ पाने | |

### <u>अटी/शर्ती</u>

१) मराठी ई-न्युज लेटरचा नमूना तयार करुन कोटेशनसोबत जोडणे आवश्यक राहील.

२) मराठी ई-न्युज लेटर दरमहा प्रकाशित करणे आवश्यक राहील. प्रसंगानूसार एखाद्या महिन्यात एका पेक्षा जास्त मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणे गरजेचे वाटल्यास त्यासाठी वेगळा चार्ज दिला जाणार नाही.

३) मराठी ई-न्युज लेटर अथवा तशा स्वरुपाचे काम केलेबाबतचा ७ वर्षाचा अनुभवाचा दाखला/पुरावा कोटेशन सोबत जोडणे आवश्यक राहील.

४) मराठी ई-न्युज लेटरसाठी लागणारी माहिती/फोटोग्राफस् मनपाच्या विविध खात्यांकडून संकलित करणे अथवा इतर ठिकाणाहून संकलित करणेची जबाबदारी कोटेशनधारकाची राहील.

५) मराठी ई-न्युज लेटरचा मसुदा तयार झालेनंतर मा. आयुक्त साो., अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचे मान्यतेनंतरच मराठी ई-न्युज लेटर प्रकाशित करणे आवश्यक आहे. अशी मान्यता घेतलेशिवाय मराठी ई-न्युज लेटर प्रकाशित केल्यास त्याबाबतची जबाबदारी कोटेशनधारकाची राहील.

वरीलप्रमाणे मराठी ई-न्युज लेटर तयार करण्याचे काम करण्याची माझी तयारी असून त्यासाठी मी/आम्ही हे कोटेशन दर सादर करीत आहे. कोटेशन सोबतच्या अटीशर्ती मला मान्य व कबूल असून त्यासाठी उक्त अटीशर्तीवर व सदरचे दरपत्रकावर स्वाक्षरी करीत आहे.

तरी मा. उपआयुक्त(स्था.सं.क.) साो., नाशिक मनपा यांचेकडेस विनंती की, सदरच्या दराचा विचार करुन मला सदरचे काम करण्याची संधी द्यावी ही विनंती.

ठिकाण :

दिनांक :    /  /२०१६                                        **कोटेशनधारकाची सही व शिक्का**

## नाशिक महानगरपालिका, नाशिक
## जनसंपर्क विभाग
## सर्वसाधारण अटी शर्ती (कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) कोटेशन नोटीस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्या मध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे/काम करणे/सेवा पुरविणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहील. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतीम राहील.

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र.रु.१२०/- चे जनरल स्टॅम्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) सेल्स टॅक्स, वाहतूक खर्च व इतर सर्व करांसह कोटेशन दर नमूद करावयाचे आहेत. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास/काम न केल्यास/सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर/केलेल्या कामावर/सेवा पुरविण्याच्या रक्कमेवर दर हजारी दर दिवसाला रु.१/- या प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडून वसुल करण्यात येईल.

७) सदरचे मंजूर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनूसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

८) एकुण बिलाच्या रक्कमेतून कामाचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनूसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल. मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास मागणीनूसार सदरची रक्कम परत करण्यात येईल.

९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास/मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल/काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहून करुन घेण्यात येईल. आणि त्या खरेदीस महानगरपालिकेस मंजूर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडून वसुल करण्यात येईल.

१०) मंजूर नमुन्याप्रमाणे/स्पेशिफिकेशनप्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास/काम न झाल्यास सदरचा माल परत करण्यात येईल अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

११) कोणताही माल मंजूर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडून खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही व याबाबत कोटेशनधारकास नुकसान भरपाई मागता येणार नाही.

१२) अटी/शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१३) कोटेशन दर मंजूर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात/कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही.

१४) पुरवठाधारकाने अटीशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातून रक्कम जप्त करण्यात येईल.

उपआयुक्त(स्था.सं.क.)
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

सदरचे अटीशर्ती मी वाचल्या असून सदरच्या अटीशर्ती मला मान्य व कबूल असून त्याप्रमाणे माल पुरविण्यास/सेवा पुरविण्यास/काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

**कोटेशनधारकाची सही व शिक्का**